हिंदवी बाण्याचे मराठी दैनिक
Daily Shiv Nirnay
शिव निर्णय
रायगड, सातारा, पुणे, सोलापूर.
07 Aug 2024 - Page 4

# सोलापूर विद्यापीठात क्वीक हिल सायबर क्लबचे उदघाटन

**शिव निर्णय**/ सोलापूर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणकशास्त्र संकुल व क्वीक हिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम राबविला जातो. या अंतर्गत विद्यापीठात सायबर क्लबचे उदघाटन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली व क्विक हिल फाऊंडेशनच्या प्रमुख अनुपमा काटकर यांच्या उपस्थितीतउपस्थितीत करण्यात आले.

या उपक्रमाव्दारे समाजातील विविध घटकामध्ये सायबर गुन्हेविषयी माहिती दिली जाते. तसेच अशा प्रकारचे गुन्हे टाळण्यासाठी विविध उपाययोजना सेमीनारव्दारे सांगितले जाते. जसे की ओटीपी कोणास सांगु नये, स्ट्रॉंग पासवर्ड वापरावा, सोशल मिडीयावर आलेले मेसेजेस व लींकची शहानिशा करावी व आपली माहिती, ही आपली जबाबदारी असे सांगितले जाते.




या कार्यक्रमास विद्यापीठाचे प्र–कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, डॉ. आर. एस. मेंते, डॉ.ए. आर. शिंदे, डॉ. एस. डी. राऊत, डॉ. जे. डी. माशाळे, सी.जी. गार्डी तसेच डॉ. ए.एस.साखरे, संदीप पोटे, सुधीर वाघमारे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कांचन निकंबे व सयी आवताडे यांनी केले.